
ePaper

**रेटून खोटे बोलण्याचे फडणवीसांवर संस्कार; सुशीलकुमार शिंदे यांचा टोला**



|| वर्ष - 7 | अंक - 327 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- गुकेश-नेपोम्निया लढत बरोबरीत
- क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा
- आम्ही जाहीर माफी मागण्यासाठी तयार
- ईव्हीएमशी छेडछाड केल्यास शिक्षा?


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 17 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## अनधिकृत भंगार दुकानांवर कारवाई करण्याची मागणी

# कुदळवाडीची सुरक्षा 'स्क्रॅप' मध्ये!

## चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे आयुक्तांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज

**चिंचवड शहरात अनाधिकृत स्क्रॅपच्या दुकानामुळे सतत आगीच्या घटना घडत आहेत. त्यामध्ये आर्थिक व इतर नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. कुदळवाडीतील आणि पिंपरी चिंचवड शहरातील ही सर्व अनाधिकृत स्क्रॅपची दुकाने यांच्यावर त्वरित कारवाई करून ही अनधिकृत बेकायदेशीर स्क्रॅपची दुकाने हटवण्याची मागणी चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने करण्यात आली. फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी त्याबाबत निवेदन दिले आहे.**



> "आमच्या कुदळवाडी परिसरात या भागामध्ये पाच ते सहा हजार अनाधिकृत कोणतीही परवानगी नसणारी दुकान रहिवासी जागेत उभे आहेत. विशेषतः या अनधिकृत स्क्रॅपच्या दुकानांना महापालिकेकडून पाणी आणि लाईट पुरवली जाते. प्रमाणिकपणे कर भरणाऱ्या आमच्या सोसायटी धारकांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. परंतु या कुदळवाडी भागातील पाच ते सहा हजार स्क्रॅपच्या दुकानांना मुबलक प्रमाणात पाणी दिले जाते. महापालिकेच्या आयुक्त साहेबांनी याकडे लक्ष देऊन कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता ही सर्व दुकान त्वरित हटवून आमच्या नागरिकांचे प्रदूषणापासून होणारे नुकसान थांबवावे. पुढील दोन-तीन महिन्यात यावर कारवाई झाली नाही तर आमच्या फेडरेशन मार्फत याबाबत तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.
>
> **-संजीवन सांगळे,**
>
> **अध्यक्ष चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनेक ठिकाणी बेकायदेशीर अनधिकृत स्क्रॅपची दुकान आहेत. विशेषतः कुदळवाडी या भागामध्ये पाच ते सहा हजार अशी कोणतीही परवानगी नसणारी बेकायदेशीर अनाधिकृत स्क्रॅपची दुकान आहेत. या स्क्रॅपच्या दुकानांमध्ये रात्री प्लास्टिक जाळले जात असल्याच्या घटना घडत आहेत. लोखंड वितळविले जाते. इतर केमिकलयुक्त पदार्थ रात्रभर जाळले जातात. यामुळे खूप मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. तसेच या भागात सतत या सर्व गोष्टीमुळे आगी लागतात आणि त्यामुळे देखील खूप मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. याच भागामध्ये दोन मोठे पेट्रोल पंप आहेत. दुर्दैवाने एखाद्यावेळी आगीच्या घटनेमध्ये हे पेट्रोल पंप देखील बेचिराक होतील आणि अर्धे अधिक शहर या आगीमुळे भस्मसात होईल. त्यामुळे या गोष्टीचे गांभीर्य ओळखून. ही सर्व स्क्रॅपची अनधिकृत दुकान ताबडतोब काढून टाकावीत आणि या कोणतीही परवानगी नसणाऱ्या अनधिकृत स्क्रॅपच्या दुकानाला आपल्या महानगरपालिकेकडून पुरविले जाणारे पाणी लाईट देखील त्वरित बंद करावे अशी मागणी सांगळे यांनी केली.

# शिरुरच्या विकासाची जबाबदारी माझी!

## शिवाजीराव आढळराव पाटील: कोपरासभांना शिरूरमध्ये मोठा प्रतिसाद

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाची तारीख जशी जशी जवळ येत आहे. तसा प्रचाराला प्रंचड वेग येत आहे. अशातच आता शिरूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी कोपरा सभा घेण्यास सुरूवात केलीय. आढळरावांच्या कोपरा सभांना आता नागरिकांचा मोठा प्रतिसाद बघायला मिळत आहेत.**




त्यातच अण्णापुर येथे गावकऱ्यांनी आढळरावांचं जंगी स्वागत केलं.अण्णापुर येथे झालेल्या कोपरा सभेत आढळरावांनी लोकांना विश्वासात घेत लोकांना महायुतीला मतदान करण्याचे आवाहन केलं. यावेळी आढळराव पाटील म्हणाले की, माझ्यावर तुम्ही ठेवलेल्या विश्वासाला सार्थ करण्यासाठीच मी तुमच्याकडे आलो आहे. मला तुम्ही पाठिंबा देणारच आहात. तुमच्या भागाच्या विकासाची जबाबदारी माझ्यावर सोडून निश्चित राहा, असे आवाहन आढळरावांकडून करण्यात आले. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी रामलिंग येथे भेट देऊन ग्रामदैवत रामलिंग महादेवाचे आढळराव पाटील यांनी दर्शन घेतले. शोभाताई रसिकलाल धारीवाल सभामंडपात मोठ्या संख्येने उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधताना गावाचे प्रलंबित प्रश्न नक्कीच मार्गी लावणार असे आश्वासन दिले.

### कर्डेलवाडीत देखील आढळराव यांचे स्वागत

लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाची तारीख जशी जशी जवळ येत आहे. तसा प्रचाराला प्रंचड वेग येत आहे. अशातच आता शिरूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी कोपरा सभा घेण्यास सुरूवात केलीय. दरम्यान, कर्डेलवाडील येथेदेखील आढळराव यांचे उत्स्फुर्त स्वागत झाले. यावेळी प्रवीण कर्डिले म्हणाले की , सतेत नसतानाही आढळराव दादांनी आपल्या विकासकामांना हातभार लावला. त्यामुळे आपण त्यांच्या पाठीशी उभे राहु. या वेळी बोलतांना आढळराव यांनी पिण्याच्या पाण्याचा आणि रस्त्यांच्या प्रश्नावर नक्कीच तोडगा काढून हा प्रश्न मिटवला जाईल असेही त्यांनी सांगितले.

# अन् पुण्याच्या व्हिजनवर धंगेकरांनी वेळ मारून नेली !

## धंगेकरांचा केवळ टीका-टिप्पणीवर भर : मोहोळ, मोरे यांची साधक-बाधक चर्चा

।राजगुरूनगर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धगेकर आणि वंचित आघाडीचे उमेदवार वसंत मोरे हे एकाच व्यासपीठावर आले. निमित्त होते पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वार्तालापाचे. या तीनही उमेदवारांनी त्यांच्या दृष्टिकोनातून "पुण्याचं व्हिजन" काय आहे यांची मांडणी केली.**




त्यामध्ये मुरलीधर मोहोळ आणि वसंत मोरे यांनी त्यांचे पुण्याच्या विकासाबद्दलच्या व्हीजनबद्दल सविस्तर मांडणी केली. मात्र, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी त्यांचे 'व्हीजन' न सांगता केवळ सांगोपांग टीका करत वेळ मारून नेली.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या तीनही उमेदवारांच्या एकत्रित वार्तालापाचे पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर आणि सरचिटणीस सुकृत मोकाशी यावेळी उपस्थित होते. महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ त्यांचे व्हीजन सांगताना गेल्या दहा वर्षात केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली झालेली देश पातळीवरची कामे. आणि मोदी सरकारच्या माध्यमातून पुणे लोकसभा मतदार संघात झालेली काम याचा आढावा घेतला आणि खासदार झाल्यानंतर त्यांचे व्हीजन काय असणार आहे याबाबत सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले, माझं पुणे हे देशातील सर्वोत्तम शहर असावं, असा आमचा प्रयत्न असणार आहे. आधी केंद्रात राज्यात आणि पालिकेत एकच सत्ताधारी होते. त्यावेळी त्यांनी पुढच्या ५० वर्षांचा विचार केला नाही, असं मला वाटतं. कागदावरची मेट्रो आम्ही सत्यात आणली.

आधीच्या लोकांनी अनेक कामाची फक्त उद्‌घाटन केली, कामं केली नाहीत. आम्ही करून दाखवलं, असे ते म्हणाले. वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. पीएमपीएल बसेस वाढवाव्या लागतील. शहरात मेट्रोचा विस्तार करणं गरजेचं असल्याचं त्यांनी सांगितलं. रिंग रोड पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करावा लागेल. नदी प्रकल्प पूर्ण करणे. पुरंदरचं विमानतळ करावं लागेल. नवी मुंबई आणि पुण्याच विमानतळ रेल्वे मार्गाने जोडण्याचा प्रयत्न असणार आहे. स्वच्छ पुणे शहर करणं गरजेचं आहे. अनेक नॅशनल रिसर्च सेंटर आणणार आहे. आयआयटीचे सेंटर पुण्यात करता येतील का पाहणं, या गोष्टींचा पाठपुरावा करून आपण पूर्ण करणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

वसंत मोरे म्हणाले, शहरातील वाहतूक कोंडी ही महत्त्वाची समस्या आहे. त्यामुळे शहराच्या चारही बाजूला बस स्थानक होणे आवश्यक आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नीट करावी लागेल. पुण्यात पाणी प्रश्न गंभीर आहे. शहरात पाण्याचं नियोजन करणं गरजेचं आहे. शहराला वेगळं धरण मिळणं गरजेचं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पाणी ,ट्रॅफिक, रस्ते यासाठी जाणकार लोकं बसवणं आवश्यक आहे. आपल्या नद्यांचं संवर्धन केलं पाहिजे.

### केवळ वेळ मारून नेली

रवींद्र धंगेकर यांनी मात्र, पुण्याच्या व्हीजन बद्दल न बोलता मोहोळ यांनी सांगितलेल्या कामांवर टीका टिप्पणी करत केवळ वेळ मारून नेली. त्यांना त्यांच्या व्हीजन बद्दल पत्रकारांनी विचारल्यानंतरही त्यांनी केवळ मोहोळ यांनी सांगितलेल्या पुणे शहरातील योजनांमध्ये कशा त्रुटी आहेत याबद्दलचा पाढा वाचला, मोहोळ यांनी त्याला आक्षेप घेत तुम्ही तुमचे व्हीजन सांगा वैयक्तिक टिक्का टिप्पणी करू नका असे सांगूनही धंगेकरांनी त्यांचे व्हीजन न सांगता केवळ वेळ मारून नेली.

# अवकाळी पावसाची हजेरी!

## शहरात वादळी वाऱ्यामुळे 24 ठिकाणी झाडपडीच्या घटना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या तीन ते चार दिवसांपासून शहरात वाढलेले तापमान, सायंकाळच्या वेळी ढगाळ वातावरणामुळे उकाड्याने पिंपरी-चिंचवडकर घामाघूम झाले असताना मंगळवारी (१६ एप्रिल) सायंकाळी सहाच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. उकाड्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांना काही अंशी दिलासा मिळाला. वादळी वाऱ्यामुळे शहरात २४ ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या आहेत.**





सायंकाळी अवकाळी पावसामुळे मुख्य अग्निशमन केंद्राच्या अग्निशमन नियंत्रण कक्षास जवळपास 24 झाडे पडण्याच्या तक्रारी आल्या. तसेच एका ठिकाणी आगीचा आणि एका ठिकाणी ऑईल गळती बाबतचे कॉल प्राप्त झाले होते. अग्निशमन विभागाचे पथके शहरात विविध ठिकाणी कार्यरत असून मदतकार्य सुरू आल्याची माहिती ऋषिकांत चिपाडे यांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या तीन-चार दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढला आहे. दिवसभर नागरिक घामाच्या धारांमध्ये न्हाऊन निघत आहे. परिणामी नागरिक उकाड्याने हैराण झाले असून आरोग्यावरही त्याचा परिणाम झाला आहे. दुपारचे तापमान ४० ते ४२अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी उन्हाचा चांगलाच चटका बसत आहे. दुपारी बाहेर फिरताना नागरिक चांगलेच घामाघूम होत आहेत. शहरात मंगळवारी दुपारचे तापमान ४२.५ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे. सायंकाळी सहाच्या सुमारास भोसरी, कासारवाडी, फुगेवाडी, वल्लभनगरसह आदी भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. दिवसभर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काही अंशी दिलासा मिळाला.

### अग्निशमन पथके विविध ठिकाणी कार्यरत

» शहरात २४ ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या आहेत. रस्त्यावर झाड उन्मळून पडल्याने नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.अग्निशमन विभागाकडून रात्री उशिरापर्यंत रस्त्यावरील झाडे हटविण्याचे काम सुरू होते. एक ठिकाणी आग, एका ठिकाणी ऑईल गळती झाली. अग्निशमन पथके शहरात विविध ठिकाणी कार्यरत असल्याचे अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांनी सांगितले.

# ‘हयातीच्या दाखल्यांसाठी’ महापालिका दिव्यांग व्यक्तींच्या दारी

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून 6699 दवव्यक्तींचे सर्वेक्षण पूर्ण

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. समाजातील विविध घटकांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी विभागाकडून विविध प्रकारे पुढाकार घेण्यात येतो. शहरातील नोंदणीकृत दिव्यांग व्यक्तींना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी ‘हयातीचा दाखला’ आवश्यक असतो. मनपा हद्दीतील विविध दिव्यांग योजनांचा लाभ घेणाऱ्या दिव्यांग व्यक्तीच्या ‘हयात दाखल्या’बाबत त्यांचे घरोघरी जाऊन समक्ष सर्वेक्षण करण्यात आले असून ६६९९ दिव्यांग व्यक्तिंचे सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. दिव्यांगाच्या हयातीच्या दाखल्यामध्ये बदल, दुरुस्ती करण्यासाठी कार्यालयामध्ये न येता त्यांच्या दाखल्यामध्ये मनपा प्रशासनाकडून ‘घरोघरी’ जाऊन नोंदणी करण्यात आली.**





दिव्यांगाच्या हयातीच्या दाखल्याचे घरोघरी जाऊन समक्ष सर्वेक्षण करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्रातील पहिली व भारतातील अग्रगण्य महानगरपालिका ठरली आहे.

### ‘असे’ झाले सर्वेक्षण...

मनपा हद्दीतील नोंदणीकृत दिव्यांग व्यक्तींच्या घरोघरी जाऊन त्यांची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्यात आली. तब्बल ६,६९९ इतक्या व्यक्तींची सर्वेक्षणाच्या माध्यमातून केवायसी पूर्ण झाली असल्याने, त्यांना आता विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. सर्वेक्षणामध्ये व्यक्तीच्या माहितीची नोंदणी करताना अक्षांश व रेखांश (जिओ टॅगिंग) ही घेतल्याने भविष्यामध्ये दिव्यांग व्यक्तींना मदत पोहोचविणे सोयीचे होणार आहे. सर्वेक्षणामध्ये दिव्यांगाची केवायसी पूर्ण करताना त्यांचे फेस रीडिंग थम्ब इम्प्रेशन, आयरिस स्कॅन व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून संकलित करण्यात आली. त्यानंतर दिव्यांग व्यक्तींना त्यांची केवायसी पूर्ण झाल्यानंतर हयातीचा दाखला देण्यात आला. सर्वेक्षणामुळे आता दिव्यांगाचा हयातीचा दाखला तत्काळ मिळण्यासाठी मदत होत आहे.

### ‘हे’ आहेत सर्वेक्षणाचे फायदे...

मॅन्युअल पद्धतीने नोंदणी पद्धतीचे डिजिटलाइजेशन झाल्याने आता एका क्लिकवर माहिती होणार उपलब्ध

दिव्यांग व्यक्तींच्या पत्त्याचे अक्षांश व रेखांश (लॅट-लॉंग) मिळाल्याने त्यांच्यापर्यंत मदत पोहोचविणे होणार सोपे

घरोघरी जाऊन सर्वेक्षणामुळे दिव्यांग व्यक्तींना कार्यालयामध्ये येण्याचा त्रास होणार कमी

### हयातीचा दाखला मिळण्यास होणार मदत...

» दिव्यांगाच्या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीनुसार, शहरामध्ये ६,६९९ मधील ५,२३२ जणांकडे म्हणजेच ७८ टक्के दिव्यांगांकडे यूडीआयडी सर्टिफिकेट असून १४६७ म्हणजेच २२ टक्के दिव्यांगांकडे हयातीचा दाखला नसल्याचे निदर्शनास आले; परंतु सर्वेक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीनुसार आता १,४६७ जणांचा हयातीचा दाखला काढण्यासाठी मदत होणार आहे.

# असेही सेवा पुरवठादार..!




**विश्वगुरूंना पाठिंबा जाहीर केल्यावर आनंदलेल्या राज ठाकरेंनी महायुतीतील घटक पक्षांशी समन्वय साधण्यासाठी बाळा, संदीप व नितीन यांच्या नावाची घोषणा केली. महायुतीच्या बैठकांत सहभागी होऊन चर्चेत राहता येईल म्हणून त्रिकूट जाम खूश होते. कमळ, धनुष्यबाण, घड्याळासोबत इंजिनसुद्धा दिसू लागेल व पक्षविस्ताराचे स्वप्न साकार होईल या समाधानात तिघे भेटीच्या तयारीला लागले.**



भाजपशी समन्वयाची जबाबदारी मिळालेले बाळा आशीषभाऊंच्या कार्यालयात पोहोचले. प्रचंड गर्दी होती. एक तासाने निरोप आला 'कोअर समिती' सुरू आहे. दोन तास वाट बघावी लागेल. 'कोअर'मध्ये आपण का नाही असा प्रश्न बाळांच्या ओठांवर आला पण त्यांनी तो गिळला. दीर्घ प्रतीक्षेनंतर आत शिरताच भाऊंनी प्रश्न केला 'हं, सांगा तुमची मतपेढी कोणत्या भागात, किती आहे?' त्याकडे दुर्लक्ष करत ते सांगू लागले '२००९ मध्ये आम्हाला या भागात इतकी मते मिळाली..' हे ऐकून भाऊंचा चेहरा त्रासला. 'अहो, इतिहास उगाळू नका. आता ताकद किती, कुठे हे आकडेवारीनिशी सांगा'. नेमके उत्तर ठाऊक नसल्याने त्यांनी साहेबांच्या सभेला लाखाची गर्दी होते. ते सारे आमचे मतदारच असा युक्तिवाद केला. वाद घालण्यात अर्थ नाही हे लक्षात येताच भाऊंनी तुमच्या पाच कॉर्नर मीटिंग आयोजित करतो, स्थळ तुम्ही निवडा असे सांगत चर्चा संपवली. राष्ट्रवादीची जबाबदारी सोपवलेल्या संदीपरावांनी अजितदादांना खूप फोन केले पण प्रतिसादच मिळाला नाही. शेवटी त्यांनी तटकरेंची वेळ मिळवली. ते म्हणाले, 'आम्ही सहा-सात जागा लढवत आहोत तिथे तुमचा किती जोर ते सांगा' संदीपराव पुणे, बारामती, रायगड, शिरूर, सातारा परिसरातील सक्रिय सैनिकांची नावे घेऊ लागले. यातले एकही नाव माझ्या परिचयाचे नाही, असे तटकरेंनी म्हणताच त्यांचा चेहरा पडला.

उगीच नाराजी नको असे पुटपुटत 'तुम्ही सर्व ठिकाणी सभा घ्या व छायाचित्रे मला पाठवा. रस्तामार्गानेच प्रवास करावा लागेल. हवाईसेवेची ऐपत नाही.' हे ऐकून संदीपराव बाहेर पडले व अलिबागची जेटी गाठली. भरपूर प्रयत्न केल्यावर नितीनदादांना एकनाथ शिंदेंनी पहाटे दोन वाजता बोलावले. नितीनदादांनी ठाण्यात आमचा प्रभाव कसा, हे सांगण्यास सुरुवात करताच त्यांचा चेहरा आक्रसला. त्यांनी प्रमुख नेत्यांची नावे सांगताच शिंदे हळूच म्हणाले 'या सर्वांना घेऊन तुम्ही आमच्या पक्षात येत का नाही?' नितीनदादांना दरदरून घाम फुटला. हे तिघेही एकत्र आले, तेव्हा झालेली अवहेलना हाच त्यांच्यातल्या चर्चेचा विषय होता. तेवढ्यात तिघांचेही लक्ष टीव्हीकडे गेले. तिथे सुषमा अंधारेताई बोलत होत्या. 'राज ठाकरेंचा पक्ष एकही टॅक्सी नसलेल्या पण सर्वांना टॅक्सी पुरवणाऱ्या ओला उबरसारखा, एकही हॉटेल नसून खाद्य पुरवणाऱ्या झोमॅटोसारखाच' हे ऐकून तिघांनीही साहेबांकडे जाण्याचा बेत रद्द केला.

भाजपशी समन्वयाची जबाबदारी मिळालेले बाळा आशीषभाऊंच्या कार्यालयात पोहोचले. प्रचंड गर्दी होती. एक तासाने निरोप आला 'कोअर समिती' सुरू आहे. दोन तास वाट बघावी लागेल. 'कोअर'मध्ये आपण का नाही असा प्रश्न बाळांच्या ओठांवर आला पण त्यांनी तो गिळला. दीर्घ प्रतीक्षेनंतर आत शिरताच भाऊंनी प्रश्न केला 'हं, सांगा तुमची मतपेढी कोणत्या भागात, किती आहे?' त्याकडे दुर्लक्ष करत ते सांगू लागले '२००९ मध्ये आम्हाला या भागात इतकी मते मिळाली..' हे ऐकून भाऊंचा चेहरा त्रासला. 'अहो, इतिहास उगाळू नका. आता ताकद किती, कुठे हे आकडेवारीनिशी सांगा'. नेमके उत्तर ठाऊक नसल्याने त्यांनी साहेबांच्या सभेला लाखाची गर्दी होते. ते सारे आमचे मतदारच असा युक्तिवाद केला. वाद घालण्यात अर्थ नाही हे लक्षात येताच भाऊंनी तुमच्या पाच कॉर्नर मीटिंग आयोजित करतो, स्थळ तुम्ही निवडा असे सांगत चर्चा संपवली.राष्ट्रवादीची जबाबदारी सोपवलेल्या संदीपरावांनी अजितदादांना खूप फोन केले पण प्रतिसादच मिळाला नाही. शेवटी त्यांनी तटकरेंची वेळ मिळवली. ते म्हणाले, 'आम्ही सहा-सात जागा लढवत आहोत तिथे तुमचा किती जोर ते सांगा' संदीपराव पुणे, बारामती, रायगड, शिरूर, सातारा परिसरातील सक्रिय सैनिकांची नावे घेऊ लागले. यातले एकही नाव माझ्या परिचयाचे नाही, असे तटकरेंनी म्हणताच त्यांचा चेहरा पडला. उगीच नाराजी नको असे पुटपुटत 'तुम्ही सर्व ठिकाणी सभा घ्या व छायाचित्रे मला पाठवा. रस्तामार्गानेच प्रवास करावा लागेल.

## संपादकीय »

# दही चालले..

***याला पाड, त्याला फोड इत्यादी उद्योगांत मशगूल आणि मग्न अशा स्थानिक राजकारण्यांस दुग्धव्यवसायातील समस्यांचे म्हणावे तेवढे गांभीर्य नाही..***

राज्यातील दुग्ध उद्योगाच्या सद्य:स्थितीविषयी सविस्तर वृत्तांत प्रसिद्ध केले. गुजरातेतील 'अमूल'कडून राज्यातील दुग्धव्यवसायास मिळत असलेले आव्हान हा या दोन वृत्तांतांचा मध्यवर्ती सूर. राज्यातील संपूर्ण दुग्धव्यवसाय बाजारपेठ सध्या 'अमूल' कवेत घेण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे यावरून लक्षात येते. आपल्याकडील दररोजच्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीतील जवळपास ४० टक्के इतका वाटा सध्या या 'अटरली, बटरली डिलिशियस' अशा 'अमूल'ने काबीज केल्याचे दिसते. यामुळे मुंबईच्या दूध आणि दुग्धजन्य उत्पादनांच्या बाजारपेठेवर लवकरच अमूलची मक्तेदारी होणार की काय, असा प्रश्न पडू शकेल. दूध, दही, पनीर, बटर, चीज, लस्सी, ताक यांची एकापेक्षा एक लोकप्रिय उत्पादने 'अमूल'ने बाजारात आणली आणि महाराष्ट्रातील डेअरी उद्योगाच्या तोंडचे पाणी पळवले.

हे छायाचित्र कुठल्याही मंदिरातील पुजाऱ्यांचे नाही, तर वाराणसीतील काशी विश्वेश्वराच्या मंदिरात बंदोबस्तासाठी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचे आहे. तिथे त्यांना या पुजाऱ्याच्या पेहरावात येण्यास सांगितले गेले. त्यांना असा हुकूम दिला होता तो वाराणसीचे आयुक्त मोहित अगरवाल यांनीच.

# पोलीस पुजारी.. की पुजारी पोलीस!



अखिलेश यादव यांनी लावून धरल्यानंतर आता या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. वास्तविक कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सुरक्षा यंत्रणांवर सोपवलेली असते. ती पार पाडताना प्रसंगी जीव धोक्यात घालण्याचीही आवश्यकता असू शकते. त्यामुळेच या यंत्रणांची कार्यक्षमता आणि कार्यपद्धती याबद्दल अधिक सतर्कता आवश्यक असते. देशातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना जी सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते, त्यासाठीही या यंत्रणांचा सातत्याने वापर होतो. परंतु गेल्या काही काळात या यंत्रणांचा वापर होताना, त्यांना आपल्या वर्दीचाही त्याग करायला लावला जात आहे आणि ही बाब अत्यंत गंभीर आहे. मंदिरांचे व्यवस्थापन करताना, तेथे येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा कायमच चर्चेत असतो. गर्दीचे नियोजन करणे ही अनेक मंदिरांसाठी कठीण गोष्ट असते. वास्तविक ही जबाबदारी पूर्णपणे मंदिर व्यवस्थापनाची. काही अपरिहार्य कारणास्तव पोलिसांची मदत घेतली गेली, तरीही त्यांना त्यांची वर्दी सोडून पुजाऱ्याचा पोशाख परिधान करायला लावणे, हा त्या यंत्रणेचा आणि व्यवस्थेचाही अपमानच म्हणायला हवा. पोलिसांना पाहून सामान्य जनता अधिक जागरूक वर्तन करेल, की पुजाऱ्यांना, असा प्रश्न या निमित्ताने विचारायला हवा. मंदिरातील पोलिसांना वर्दी उतरवायला लावणे केवळ निंदाजनकच नव्हे, तर धोकादायकही ठरू शकते. विश्वनाथ मंदिरातील भाविकांची गर्दी वाढत असताना, ती नियंत्रित करण्यासाठी जी सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे, तिचे काम दर्शन घेणाऱ्यांची सोय बघणे हे असते. रस्त्यावरील गुंडागर्दी आणि मंदिरातील गर्दी यातील फरक लक्षात घेऊनच त्यांनी काम करणे अपेक्षित असते, असा युक्तिवाद वरिष्ठ पोलीस अधिकारी करत असले, तरीही याचा गैरफायदा घेतला जाण्याची शक्यताही गृहीत धरायला हवी. पुजाऱ्याच्या पोशाखात एखादा समाजकंटक मंदिरात घुसू शकतो आणि गोंधळ उडवू शकतो. त्यामुळे सरकारच जर पोलिसांच्या वर्दीचे महत्त्व कमी करण्यास तयार असेल, या यंत्रणेचे धार्मिकीकरण करत असेल तर पोलीस बिचारे काय करतील?केरळमधील गुरुवायूर मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबरचे विशेष पोलीस दलातील कमांडोही अशाच वेगळ्या पेहरावात दिसून आल्याची चर्चा समाजमाध्यमात झाली. पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेचा भाग असलेले हे कमांडो तिथे पांढऱ्या धोतीमध्ये दिसत होते. ते या पेहरावात दिसल्यामुळे त्या वेळी टीका झाली होती. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींभोवती असलेले सुरक्षा कडे वा ती यंत्रणा अधिकृतपणे वावरत राहण, तिचे दृश्य रूप ठसत राहणे ही तेवढीच महत्त्वाची.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदे आणि अजित पवारांना भाजप संपवणार!

## मी पुन्हा आलो तेपण दोन पक्ष फोडून असं फडणवीस म्हणाले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीची लगबग सुरु झाली आहे. तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांच्या रांगा लागत आहेत. पश्चिम महाराष्ट्रातल्या उमेदवारांनी आज आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यामध्ये धाराशिवच्या ओमराजे निंबाळकर यांचाही समावेश आहे. शक्तिप्रदर्शन करत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.**



यानंतर झालेल्या सभेत आदित्य ठाकरे, आमदार रोहित पवार, माजी मंत्री अमित देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी झालेल्या भाषणात अमित देशमुख यांनी भाजपावर गंभीर आरोप केला आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचं नाव घेत अमित देशमुख यांनी हा आरोप केला आहे. तसंच शेतकऱ्यांच्या प्रश्नावरुनही अमित देशमुख यांनी भाजपावर टीका केली आहे.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत मी पुन्हा आलो पण दोन पक्ष फोडून आलो असं म्हटलं होतं. त्याच वाक्याचा संदर्भ घेऊन अमित देशमुख यांनी भाजपावर आरोप केला आहे. शिवसेना फुटल्यानंतर एकनाथ शिंदे यांना बरोबर घेत भाजपाची सत्ता स्थापन झाली. त्यानंतर बरोबर वर्षभराने अजित पवारही महायुतीत सहभागी झाले. त्यांचाही पक्ष फुटला. असं असलं तरीही लोकसभेच्या जागावाटपावरुन दोन्ही नेते म्हणजेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नाराज असल्याची चर्चा आहे. महायुतीतल्या काही जागांचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. हा सगळा संदर्भ देत अमित देशमुख यांनी भाजपावर टीका केली.महाराष्ट्रात महायुतीत कोण कोणत्या पक्षात आहे? कोण कुणाचा अर्ज भरणार आहे, कोण कुणाचा प्रचार करणार आहे? कुणाच्या तिकिटावर कोण उभं राहणार आहे काहीही कळायला मार्ग नाही. भाजपाने फोडाफोडी केली. महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात भाजपाने फोडाफोडी केली. महाराष्ट्रातली आजची परिस्थिती फारच दयनीय आहे. असं अमित देशमुख म्हणाले.जी काही फोडाफोडी झाली त्यावरुन आपल्याला वाटत होतं की भाजपाला उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना राजकीयदृष्ट्या संपवायचं आहे. मात्र महायुतीत आत्ता जे काही चाललं आहे त्यावरुन भाजपाचा खरा कट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात असल्याचंच वाटतं आहे असंही अमित देशमुख यांनी म्हटलं आहे. निवडणूक आयोगाने ज्यांना मूळ पक्ष म्हणून मान्यता दिली ते कमी जागा लढवत आहेत आणि जे पक्ष खोटे ठरवले आहेत ते जास्त जागा लढवत आहेत. आमच्या हाती एक सर्व्हे आला आहे. त्यानुसार राज्यात महाविकास आघाडीला ३९ तर महायुतीला अवघ्या ९ जागा मिळतील असं चित्र आहे असंही यावेळी अमित देशमुख म्हणाले.

यानंतर झालेल्या सभेत आदित्य ठाकरे, आमदार रोहित पवार, माजी मंत्री अमित देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी झालेल्या भाषणात अमित देशमुख यांनी भाजपावर गंभीर आरोप केला आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचं नाव घेत अमित देशमुख यांनी हा आरोप केला आहे. तसंच शेतकऱ्यांच्या प्रश्नावरुनही अमित देशमुख यांनी भाजपावर टीका केली आहे.

### काय म्हणाले अमित देशमुख?

» उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत मी पुन्हा आलो पण दोन पक्ष फोडून आलो असं म्हटलं होतं. त्याच वाक्याचा संदर्भ घेऊन अमित देशमुख यांनी भाजपावर आरोप केला आहे. शिवसेना फुटल्यानंतर एकनाथ शिंदे यांना बरोबर घेत भाजपाची सत्ता स्थापन झाली. त्यानंतर बरोबर वर्षभराने अजित पवारही महायुतीत सहभागी झाले. त्यांचाही पक्ष फुटला. असं असलं तरीही लोकसभेच्या जागावाटपावरुन दोन्ही नेते म्हणजेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नाराज असल्याची चर्चा आहे. महायुतीतल्या काही जागांचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. हा सगळा संदर्भ देत अमित देशमुख यांनी भाजपावर टीका केली. महाराष्ट्रात महायुतीत कोण कोणत्या पक्षात आहे? कोण कुणाचा अर्ज भरणार आहे, कोण कुणाचा प्रचार करणार आहे? कुणाच्या तिकिटावर कोण उभं राहणार आहे काहीही कळायला मार्ग नाही. भाजपाने फोडाफोडी केली. महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात भाजपाने फोडाफोडी केली. महाराष्ट्रातली आजची परिस्थिती फारच दयनीय आहे. असं अमित देशमुख म्हणाले.

# भ्रष्टाचाराचे सर्व आरोप शशिकांत शिंदे यांनी फेटाळले

## भ्रष्टाचार केला आहे त्यांच्यावर कारवाई तर होणारच- उदयनराजे

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील ज्या घोटाळ्याचा उल्लेख विरोधक करतात, त्याचा आणि माझ्यासह बाजार समितीतील संचालकांचा काडीमात्र संबंध नाही. ऐन लोकसभा निवडणुकीत सातारा मतदारसंघांमध्ये खासदार शरद पवार यांच्या पाठीशी मोठ्या संख्येने जनता उभी राहिली.**



माझ्यावर बेछूट आरोप केले आहेत, असे सांगत मुंबई बाजार समितीतील भ्रष्टाचाराचे सर्व आरोप आमदार शशिकांत शिंदे यांनी फेटाळले आहेत. एका-एका प्रकरणांचा उलगडा करणार घोटाळेबाजाच्या एका-एका प्रकरणांचा उलगडा आम्ही त्या-त्यावेळी करणार असल्याचा इशाराही नरेंद्र पाटील यांनी दिला. कराडमध्ये पत्रकारांशी बोलताना पाटील ते पुढे म्हणाले, अशा घोटाळेबाजाला उमेदवारी मिळते याचे खूप वाईट वाटते. सातारा येथील राष्ट्रवादी भवनात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुंबई बाजार समितीचे संचालक बाळासाहेब सोळसकर यांची यावेळी उपस्थित होते. माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील आणि कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांनी मुंबई बाजार समितीचे अनुषंगाने आमदार शशिकांत शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत शशिकांत शिंदे यांनी पत्रकार परिषद आपली बाजू मांडली.शशिकांत शिंदे म्हणाले, बाजार समितीतील आमचे संचालक मंडळ २००८ मध्ये अस्तित्वात आले आहे. तर व्यापाऱ्यांना गाळेवाटप हे १९९० मध्ये झालेले आहे. व्यापाऱ्यांना बाजार समितीतील त्यांचा वाढीव एफएसआय हवा होता, बाजार समितीचे संचालक मंडळाने त्याच्यावर ठराव करून तो पणन मंत्रालयाला पाठवला होता. भाजपचे नेते तत्कालीन पणन मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी त्याला मान्यता दिली होती.

### जमीन कशासाठी द्यायचा

» या प्रस्तावाला पर्यावरण दिल्ली यांची मान्यता घेतली होती. त्यानंतर सिडको महानगरपालिकेला योग्य तो कर भरला होता आणि बाजार समितीने व्यापाऱ्यांकडून चेक ने पैसे घेऊन ते खात्यावर भरलेले आहेत.लोकशाहीमध्ये निवडणूक आल्या की आरोप प्रत्यारोप होतात. मात्र, सध्या यंत्रणेचा वापर करून राजकीय विश्वासहर्ता संपविण्याचा घाणेरडा प्रयत्न आरोप करणाऱ्यांकडून होत आहे. ज्या चार हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याबाबत आरोप करणारे बोलत आहेत, त्याबाबत दोषी कोण आहेत, हेच ठरलेले नाही. सरकारी यंत्रणेचा वापर करून बाजार समितीतील घोटाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. असे आरोप होत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून या प्रकरणी जामीन मागितला. न्यायालयाने या सर्व प्रकरणात तुमचे नावच कुठे नाही तर तुम्हाला जमीन कशासाठी द्यायचा असा प्रश्न विचारला. जेव्हा तुमचे नाव येईल तेव्हा बघू असे न्यायालय म्हणाले.

# ईव्हीएमशी छेडछाड केल्यास शिक्षा?

## सर्वोच्च न्यायालयाची निवडणूक आयोगाला विचारणा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मतदानानंतर सर्व मतदान यंत्रांची पूर्ण तपासणी केली जावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती संजीव खन्ना व न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी चालू आहे. यावेळी न्यायालयाने व्हीव्हीपॅट व मशीनद्वारे चालणारी निवडणूक प्रक्रिया या मुद्द्यांवर सूचक टिप्पणी केली. तसेच, यावेळी निवडणुकीसंदर्भातील व्यवस्थेवर संशय घेतला जाऊ नये, अशी भूमिकाही न्यायालयाने यावेळी व्यक्त केली. बार अँड बेंचनं यासंदर्भातलं सविस्तर उत्तर दिलं आहे.**



ईव्हीएममध्ये कुणी छेडछाड केल्यास त्यावर काही शिक्षेची तरतूद आहे का? अशी विचारणा यावेळी न्यायालयाने याचिकाकर्त्यांना केली. "समजा जर ईव्हीएम मशीनमध्ये कुणी छेडछाड केली तर त्यासाठी शिक्षेची काय तरतूद आहे? कारण ही एक गंभीर बाब आहे.

जर काही चुकीचं केलं, तर त्यासाठी शिक्षा आहे याची भीती असायला हवी", असं न्यायालयाने नमूद केलं.

यावर कार्यालयीन प्रक्रियेची तरतूद असल्याचं निवडणूक आयोगाने सांगितलं. त्यावरही न्यायालयाने टिप्पणी केली. आपण इथे नियमित कार्यालयीन प्रक्रियेविषयी बोलत नाही आहोत. अशा छेडछाडीवर शिक्षेबाबत निश्चित अशी तरतूद आहे की नाही, यासंदर्भात बोलतोय", असं न्यायमूर्ती खन्ना म्हणाले. मात्र, त्याचवेळी त्यांनी व्यवस्थेवर संशय उपस्थित केला जाऊ नये, असंही स्पष्ट केलं. "आपल्याला कुणावरतरी विश्वास, श्रद्धा ठेवायला हवी. अशा प्रकारे व्यवस्थाच विस्कळीत करण्याचा प्रयत्न करू नका", असं न्यायालयाने नमूद केलं.दरम्यान, यावेळी न्यायालयाने निवडणुका मतपत्रिकांवर घेण्याची मागणी फेटाळून लावली.

"सामान्य स्थितीत कोणत्याही गोष्टीमध्ये मानवी हस्तक्षेप आल्यास अडचणी निर्माण होतात. पूर्वग्रह, इतर अडचणी अशा गोष्टी असतात. सामान्यपणे मानवी हस्तक्षेपाशिवाय यंत्र अचूक निष्कर्ष देतात. पण अर्थात, जेव्हा यंत्रांमध्ये मानवी हस्तक्षेप होतो, त्यात नियमबाह्य पद्धतीने बदल करण्याचे प्रयत्न होतात, तेव्हा समस्या उद्भवतात", असं न्यायालयाने नमूद केलं.

### केंद्रांवर सीसीटीव्ही आहेत का?

आपण इथे नियमित कार्यालयीन प्रक्रियेविषयी बोलत नाही आहोत. अशा छेडछाडीवर शिक्षेबाबत निश्चित अशी तरतूद आहे की नाही, यासंदर्भात बोलतोय", असं न्यायमूर्ती खन्ना म्हणाले. मात्र, त्याचवेळी त्यांनी व्यवस्थेवर संशय उपस्थित केला जाऊ नये, असंही स्पष्ट केलं. "आपल्याला कुणावरतरी विश्वास, श्रद्धा ठेवायला हवी. असं न्यायालयाने नमूद केलं.दरम्यान, यावेळी न्यायालयाने निवडणुका मतपत्रिकांवर घेण्याची मागणी फेटाळून लावली. "सामान्य स्थितीत कोणत्याही गोष्टीमध्ये मानवी हस्तक्षेप आल्यास अडचणी निर्माण होतात. पूर्वग्रह, इतर अडचणी अशा गोष्टी असतात. सामान्यपणे मानवी हस्तक्षेपाशिवाय यंत्र अचूक निष्कर्ष देतात. पण अर्थात, जेव्हा यंत्रांमध्ये मानवी हस्तक्षेप होतो, त्यात नियमबाह्य पद्धतीने बदल करण्याचे प्रयत्न होतात, तेव्हा समस्या उद्भवतात", असं न्यायालयाने नमूद केलं.दरम्यान, देशातील सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही आहेत का? अशी विचारणा न्यायालयाने केली असता त्यावर निवडणूक आयोगाने नकारार्थी उत्तर दिलं. "देशातील साधारण ५० टक्के मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत", असं उत्तर आयोगाकडून देण्यात आलं. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ एप्रिल रोजी होणार आहे.

# आम्ही जाहीर माफी मागण्यासाठी तयार!

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर रामदेव बाबांची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**योगगुरु रामदेवबाबा आणि पतंजली आयुर्वेद संस्थेचे संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी एक आठवड्याच्या आत जनतेची बिनशर्त माफी मागावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. जनतेची दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या प्रकरणात हा निकाल न्यायालयाने दिला आहे. त्यानंतर आता रामदेवबाबांचं या प्रकरणी काय म्हणणं आहे ते समोर आलं आहे.**




मागच्या आठवड्यात १० एप्रिल रोजी जेव्हा खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली होती, तेव्हा खंडपीठाने बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांची माफी स्वीकारण्यास नकार दिला होता. त्यानंतर आज दोघांनीही जाहीर माफी मागण्यास तयार असल्याचे सांगितले. इंडियन मेडिकल असोसिएशनने (IMA) दाखल केलेल्या नोटिशीला उत्तर देताना त्यांनी ही बिनशर्त माफी मागितली होती. आता पुन्हा एकदा रामदेवबाबांचं म्हणणं समोर आलं आहे.सर्वोच्च न्यायलयाने रामदेवबाबाना विचारणा केली की तुम्हाला तुमचं काही म्हणणं मांडायचं आहे का? त्यावर त्यांचे वकील मुकुल रहतोगी म्हणाले की आम्ही आता कुठलीही फाईल दाखल करणार नाही. तसंच आम्ही (रामदेवबाबा) जाहीर माफी मागायला तयार आहोत. रामदेवबाबा आणि आचार्य बाळकृष्ण यांनी जाहीर माफी मागावी आणि ती वृत्तपत्रात छापावी असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीच्या दरम्यान रामदेवबाबा आणि आचार्य बाळकृष्ण यांच्याशी चर्चा केली. जस्टिस कोहली म्हणाले स्वामी रामदेव तुम्ही तर जगप्रसिद्ध झाला आहात. योग क्षेत्रात तुमचं योगदान मोठं आहे. तुम्ही व्यवसायातही उतरला आहेत. तुम्हाला आम्ही माफी दिली पाहिजे का? असं विचारलं असता रामदेवबाबा म्हणाले, "माझ्याकडून अजाणतेपणी ही चूक झाली आहे. एका उत्साहात येऊन आम्ही या जाहिराती केल्या. मात्र यापुढे मी अधिक सजग राहिन" असं रामदेवबाबांनी म्हटलं आहे. आज तकने हे वृत्त दिलं आहे.

पतंजलीने दिशाभूल करणाऱ्या जाहिराती केल्याबद्दल १७ ऑगस्ट २०२२ पासून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे. पतंजलीच्या आयुर्वेदिक औषधांनी काही आजार बरे होत असल्याचा दावा करण्यात आला होता. इंडियन मेडिकल असोसिएशनने या दाव्यावर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मागच्या आठवड्यात १० एप्रिल रोजी जेव्हा खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली होती, तेव्हा खंडपीठाने बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांची माफी स्वीकारण्यास नकार दिला होता. त्यानंतर आज दोघांनीही जाहीर माफी मागण्यास तयार असल्याचे सांगितले. इंडियन मेडिकल असोसिएशनने (IMA) दाखल केलेल्या नोटिशीला उत्तर देताना त्यांनी ही बिनशर्त माफी

### जाहीर माफी मागायला तयार

आता पुन्हा एकदा रामदेवबाबांचं म्हणणं समोर आलं आहे. सर्वोच्च न्यायलयाने रामदेवबाबाना विचारणा केली की तुम्हाला तुमचं काही म्हणणं मांडायचं आहे का? त्यावर त्यांचे वकील मुकुल रहतोगी म्हणाले की आम्ही आता कुठलीही फाईल दाखल करणार नाही. तसंच आम्ही (रामदेवबाबा) जाहीर माफी मागायला तयार आहोत. रामदेवबाबा आणि आचार्य बाळकृष्ण यांनी जाहीर माफी मागावी आणि ती वृत्तपत्रात छापावी असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीच्या दरम्यान रामदेवबाबा आणि आचार्य बाळकृष्ण यांच्याशी चर्चा केली.

# अमिताभ बच्चन यांना यंदाचा लता मंगेशकर पुरस्कार

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमिताभ बच्चन यांचा जलवा अजूनही कायम आहे. त्यांना ही नावं आणि प्रसिद्धी इतक्या सहजासहजी मिळाली नाहीत. प्रत्येक कलाकारांच्या वाटेला संघर्ष असतोच. तसाच बिग बींना देखील करिअरच्या सुरुवातीपासूनच खूप संघर्ष करावा लागला. या सिनेसृष्टीत त्यांना जवळपास पाच दशक पूर्ण झाली आहेत. या पाच दशकात त्यांनी अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यामुळे सिनेसृष्टीतील बिग बींच्या या कारकीर्दीबद्दल आणि योगदानाबद्दल यंदा त्यांना लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गेल्यावर्षी लता दीनानाथ मंगेशकर हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रदान करण्यात आला होता. यंदा हा पुरस्कार अमिताभ बच्चन यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राचा मानाचा पुरस्कार सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कार सोहळ्याची आज घोषणा झाली. पंडित हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि आदिनाथ मंगेशकर यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली. दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२व्या पुण्यतिथीनिमित्ताने एप्रिलला हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. दीनानाथ नाट्यगृह येथे हा सोहळा रंगणार आहे. या सोहळ्यात अमिताभ बच्चन यांच्यासह संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, पत्रकारीता व सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार होणार आहे.

# सुयश शर्मा याच्याशी शाहरुखच्या गप्पा रंगल्या

बॉलीवूडचा किंग खान शाहरुख खान उत्तम अभिनेता तर आहेच पण आयपीएल सामन्यातील संघ ‘कोलकाता नाइट रायडर्स’चा मालकदेखील आहे. आयपीएलच्या हंगामाला सुरूवात झाल्यापासून संपूर्ण भारतात क्रिकेटमय वातावरण झालं आहे. १४ एप्रिल रोजी रविवारी ‘कोलकाता नाइट रायडर्स’ विरुद्ध ‘लखनऊ सुपर जायंट्स’ यांचा सामना पार पडला. या सामन्यात कोलकाताने लखनऊवर ८ विकेट्सनी विजय मिळवला. या सामन्यानंतर शाहरुखने खेळाडूंची भेट घेतली.‘कोलकाता नाइट रायडर्स’ संघातील क्रिकेटपटू सुयश शर्मा याच्याशी शाहरुखच्या चांगल्याच गप्पा रंगल्या होत्या. फॅशन, लूक्समुळे नेहमीच चर्चेत असणाऱ्या शाहरुखला सुयशच्या हेयरस्टाईलची भुरळ पडली. याचाच व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होताना दिसतोय.शाहरुख खान क्रिकेटर सुयशला मैदानात भेटला. त्याने क्रिकेटरची गळाभेट घेतली. तेव्हा शाहरुखने क्रिकेटर सुयशची हेअरस्टाईल बघितली आणि त्याला ती प्रचंड आवडली. त्याने सुयशला विचारलं, “कोणाच्या सांगण्यावरून तू ही हेअरस्टाईल केली आहेस.” यावर सुयश म्हणाला, “मी स्वतःच केली आहे.”मैदानात गप्पा मारत असतानाच शाहरुखने त्याच्या मॅनेजर पूजा ददलानीला हाक मारली आणि सांगितले, “पूजा मला अशीच हेअरस्टाईल हवी आहे.” यावर आजूबाजूला असलेले सगळे क्रिकेटर हसले.

# अनुष्काने दाखवली लेकाची झलक

अभिनेत्री अनुष्का शर्माने १५ फेब्रुवारी रोजी अकायला जन्म दिला. दुसऱ्या बाळाचं स्वागत करण्यासाठी जानेवारी महिन्यात विराट-अनुष्का लंडनला रवाना झाले होते. कुटुंबाला वेळ देण्यासाठी कोहलीने कसोटी सामन्यांमधून काही काळ ब्रेक घेतला होता. लेकाच्या जन्मानंतर आणि आयपीएलच्या निमित्ताने मार्च महिन्यात विराट कोहली एकटा भारतात आला. यावेळी चाहत्यांसह पापाराझींनी त्याच्याकडे अनुष्काबद्दल विचारपूस केली होती. गेल्या अनेक दिवसांपासून अभिनेत्री दोन्ही मुलांसह लवकरच भारतात परतणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. अखेर काही महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अनुष्का शर्मा तिची दोन्ही मुलं वामिका आणि अकायबरोबर भारतात परतली आहे. यासंदर्भात ‘विरल भय्यानी’ या पापाराझी इन्स्टाग्राम पेजवरून माहिती देण्यात आली आहे. शिवाय अनुष्काने पापाराझींना अकायसह वामिकाची झलक दाखवल्याचा दावा सुद्धा या पोस्टमध्ये करण्यात आला आहे.विराट कोहली आणि अनुष्का शर्माने २०१७ मध्ये लग्नगाठ बांधली. यानंतर तीन वर्षांनी अनुष्काने वामिकाला जन्म दिला. लेकीचा जन्म झाल्यावर तिचे कोणीही फोटो काढू नयेत असा अनुष्काचा कायम आग्रह होता. तिची हीच अट यापुढे सुद्धा कायम राहणार आहे. पापाराझींनी दिलेल्या माहितीनुसार, अनुष्का शर्माने लेक अकायची झलक विमानतळावर पापाराझींना दाखवली. तसेच “लवकरच निवांत आणि जेव्हा माझी मुलं माझ्याबरोबर नसतील तेव्हा मी फोटोसाठी पोज देईल.” असं अभिनेत्रीने सांगितलं आहे.



# क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा

बॉलीवूड कपल पुलकित सम्राट आणि क्रिती खरबंदा यांचा विवाहसोहळा १५ मार्चला थाटामाटात पार पडला. पुलकित-क्रितीने मानेसरमध्ये लग्नगाठ बांधली. पुलकित-क्रितीच्या लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते. १५ एप्रिलला पुलकित-क्रितीच्या लग्नाला एक महिना पूर्ण झाला. या निमित्ताने दोघांनी आपल्या सोशल मीडियावर लग्नसोहळ्यातील काही क्षण शेअर केले आहेत. नवरीची मंडपात एंट्री होताच पुलकितचे अश्रू अनावर झाले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होतोय. क्रिती आणि पुलकितने या खास दिवशी एकमेकांसाठी छोटसं स्पीच तयार केलं होतं. यात त्यांनी एकमेकांबद्दल खूप सुंदर गोष्टी लिहिल्या होत्या. आपल्या भावना व्यक्त करत असताना दोघांचेही डोळे पाणावले होते.सप्तपदीच्या आधी पुलकित क्रितीला भेटायला आला होता. तेव्हा “ब्राईड ओ ब्राईड” अशी हाक मारत त्याने क्रितीला बोलावलं. पुलकितच्या हाकेनंतर क्रिती बाहेर आली आणि तिने त्याला घट्ट मिठी मारली. क्रितीने याचा व्हिडीओ तिच्या अधिकृत सोशल मीडियावर शेअर केला आहे. “जेव्हा आम्ही एकमेकांना शोधलं, तेव्हा खरंतर आम्ही स्वतःला शोधलं आणि हे सर्वात सुंदर प्रकारचं प्रेम आहे. आता तर लग्नाला एक महिना झाला आहे, पण कायम आयुष्य एकत्र जगण्याची सुरुवात खूप आधीपासूनच सुरू झाली आहे.”क्रितीने लग्नाचे फोटो आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केले होते. लग्नासाठी क्रितीने बेबी पिंक रंगाचा लेहेंगा निवडला होता, तर पुलकितने या खास दिवसासाठी ऑलिव्ह ग्रीन रंगाची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीची खासियत म्हणजे यावर संस्कृतमध्ये मंत्र लिहिलेले होते. सुंदर कॅप्शन देत क्रितीने हे लग्नाचे फोटो शेअर केले होते. क्रितीने लग्नाचे फोटो शेअर केल्यानंतर बॉलीवूड कलाविश्वातून शुभेच्छांचा वर्षाव झाला होता.दरम्यान, पुलकित व क्रितीबद्दल सांगायचं झाल्यास मागच्या काही वर्षांपासून ते एकमेकांना डेट करत होते. दोघांनी काही महिन्यांपूर्वी मार्चमध्ये लग्न करणार असल्याचे संकेत फोटो पोस्ट करून दिले होते.

# 15व्या वर्षात विद्या पडली होती प्रेमात



आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशनसमध्ये व्यग्र आहे. रोमँटिक कॉमेडी चित्रपट ‘दो और दो प्यार’ येत्या शुक्रवारी म्हणजेच १९ एप्रिलला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे विद्या बालन पुन्हा एकदा नवी भूमिका घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी विद्या बालन आणि अभिनेता प्रतीक गांधीने इन्स्टंट बॉलीवूडला भेट दिली. नुकत्याच ‘इन्स्टंट बॉलीवूड’ला दिलेल्या मुलाखतीत विद्याने आपल्या पहिल्या प्रेमाबद्दल सांगितलं. मुलाखतदाराने पहिल्यांदा प्रेमात पडल्याचा किस्सा विचारला असता विद्या म्हणाली, “मी जेव्हा पहिल्यांदा प्रेमात पडले तेव्हा मी १५ वर्षांची होते. ते फक्त आकर्षण होतं आणि प्रेम नव्हतं. पण तेव्हा मला वाटायचं की, मला माझं प्रेम मिळालं आहे. आता याच्याबरोबरच लग्न, याच्याबरोबरच आयुष्य घालवणार आणि हेच माझं नशीब आहे. नंतर काही दिवसांनी मला त्याची वेगळीच बाजू दिसली आणि मला ते आवडलं नाही, पटलं नाही, मग मी त्याचा विचार सोडून दिला.”पहिल्यांदा झालेल्या हार्टब्रेकबद्दलही विद्या बालनने सांगितलं. ती म्हणाली, “मी ज्या मुलाला पहिल्यांदा डेट केलेलं त्याने माझं हार्टब्रेक केलं, कारण त्याने मला फसवलं होतं. आमचं नुकतचं ब्रेकअप झालेलं आणि व्हॅलेन्टाईन्स डेला तो मला कॉलेजमध्ये दिसला. आम्ही एकाच कॉलेजमध्ये होतो. तो मला म्हणाला की, मी माझ्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर डेटला जातोय. मी यावर त्याला ओके म्हटलं. कारण तेव्हा मला खूप त्रास झाला होता. मी सांगूही शकत नाही इतकं वाईट वाटलेलं मला.”चित्रपटातील विद्या बालनचा सहकलाकार प्रतीक गांधीनेही त्याच्या प्रेमाबद्दल सांगितलं. प्रतीक एकदाच प्रेमात पडला आणि दोन वर्षे मागे लागून त्याने त्याची पत्नी भामिनी ओझाशीचं लग्न केलं.दरम्यान, शीर्षा गुहा ठाकुरता दिग्दर्शित ‘दो और दो प्यार’ चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर, या चित्रपटात विद्या बालनसह प्रतीक गांधी, इलिआना डिक्रुझ, सेंधिल राममूर्ती यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. १९ एप्रिलला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशन्समध्ये व्यग्र आहे.

# गुकेश-नेपोम्निया लढत बरोबरीत!

## विदितने प्रज्ञानंदला रोखले; कारुआना, नाकामुरा विजयी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारताच्या डी. गुकेशने रशियाच्या इयान नेपोम्नियाशीविरुद्ध बरोबरीची नोंद करताना 'कॅन्डिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धेच्या दहाव्या फेरीअंती संयुक्त आघाडी कायम राखली. दहाव्या फेरीत दोन भारतीय ग्रँडमास्टर बुद्धिबळपटूंमध्ये झालेल्या लढतीत नाशिककर विदित गुजराथीने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना आर. प्रज्ञानंदला बरोबरीत रोखले. खुल्या विभागातील अन्य दोन लढतींत अमेरिकेच्या फॅबियानो कारुआना आणि हिकारू नाकामुरा विजयी ठरले.**



अखेरच्या चार फेऱ्या शिल्लक असताना 'कॅन्डिडेट्स'मध्ये मोठी चुरस निर्माण झाली आहे. संयुक्त आघाडीवर असणाऱ्या गुकेश आणि नेपोम्नियाशी यांचे समान सहा गुण आहेत. प्रज्ञानंद, कारुआना आणि नाकामुरा त्यांच्यापेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहेत. विदित पाच गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. फ्रान्सचा अलिरेझा फिरुझा ३.५ गुणांसह सातव्या, तर अझरबैजानचा निजात अबासोव तीन गुणांसह आठव्या स्थानी आहे. ११व्या फेरीपूर्वी विश्रांतीचा दिवस आहे.दहाव्या फेरीत नाकामुराने अबासोवला, तर कारुआनाने फिरुझाला पराभूत केले. या फेरीतील सर्वांचे लक्ष लागलेली गुकेश आणि नेपोम्नियाशी यांच्यातील लढत बरोबरीत सुटली. नेपोम्नियाशी यंदाच्या स्पर्धेत अपराजित असला, तरी त्याचा खेळ गुकेशइतका बहरलेला नाही. गुकेशविरुद्ध पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळतानाही त्याने धोका पत्करणे टाळले. रुइ लोपेझ पद्धतीने सुरुवात केल्यानंतर नेपोम्नियाशी पटावर भक्कम स्थितीत होता. मात्र, गुकेशने चांगल्या चाली रचत सामन्यात रंगत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अखेरच्या टप्प्यात दोन्ही खेळाडूंनी हत्तींचे आणि काही प्याद्यांची अदलाबदल केली. मात्र, दोघांनाही विजयाची संधी दिसत नसल्याने ४० चालींअंती त्यांनी बरोबरी मान्य केली. प्रज्ञानंदने या स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. दुसऱ्या फेरीतील गुकेशविरुद्धचा पराभव वगळता तो कोणत्याही लढतीत फारसा अडचणीत सापडलेला नाही. दहाव्या फेरीत १८ वर्षीय प्रज्ञानंदला विदितने वापरलेल्या बर्लिन बचावाचा सामना करावा लागला. तीन प्यादी आणि वजीर टिपल्यानंतर अखेरच्या टप्प्यात दोन्ही भारतीयांना जिंकण्याची फारशी संधी नव्हती. त्यामुळे ३९ चालींअंती त्यांनी बरोबरीवर समाधान मानण्याचा निर्णय घेतला. महिला विभागात, पहिल्या नऊ फेऱ्यांत अपराजित राहिलेल्या रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिनाला दहाव्या फेरीत चीनच्या ले टिंगजीकडून हार पत्करावी लागली. सलग चार पराभवांनंतर भारताच्या आर. वैशालीने चांगले पुनरागमन करताना बल्गेरियाच्या नुरग्युल सलिमोवावर ८८ चालींत मात केली. भारताची अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने गुणतालिकेत संयुक्त आघाडीवर असलेल्या चीनच्या टॅन झोंगीला बरोबरीत रोखले, तर रशियाची कॅटेरिना लायनो आणि युक्रेनची ॲना मुझिचुक यांच्यातील लढतही बरोबरीत सुटली. दहाव्या फेरीच्या निकालांनंतर महिलांमध्ये चीनच्या झोंगी आणि टिंगजी प्रत्येकी ६.५ गुणांसह संयुक्तरीत्या आघाडीवर आहेत.

### दहाव्या फेरीचे निकाल

» हम्पी ४.५ गुणांसह पाचव्या, सलिमोवा आणि मुझिचुक समान ४ गुणांसह संयुक्त सहाव्या, तर वैशाली ३.५ गुणांसह आठव्या स्थानी आहे.इयान नेपोम्नियाशी (एकूण ६ गुण) बरोबरी वि. डी. गुकेश (६), आर. प्रज्ञानंद (५.५) बरोबरी वि. विदित गुजराथी (५), हिकारू नाकामुरा (५.५) विजयी वि. निजात अबासोव (३), फॅबियानो कारुआना (५.५) विजयी वि. अलिरेझा फिरुझा (३.५).प्रतिष्ठेची 'कॅन्डिडेट्स' स्पर्धा दिवसेंदिवस रंजक आणि उत्कंठावर्धक होत चालली आहेत. कारुआना, नाकामुरा आणि प्रज्ञानंद (प्रत्येकी ५.५) हे त्रिकूट त्यांच्यापेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहे. विदित केवळ अर्ध्या गुणाने या त्रिकुटाच्या मागे आहे. दोन आघाडीवीरांच्या लढतीत नेपोम्नियाशीने पांढऱ्या मोहऱ्यांकडून आक्रमक खेळ केलाच नाही आणि गुकेशने सहज बरोबरी साधली.

# जोस बटलरचे आयपीएलमधील सातवे शतक

## राजस्थानने विक्रमी पाठलागाची केली बरोबरी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**जोस बटलरच्या शतकी कामगिरीच्या जोरावर राजस्थानने केकेआरचा २ विकेट्सने पराभव केला. कोलकाताने दिलेल्या २२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना एकटा जॉस बटलर कोलकाता संघावर भारी पडला. राजस्थानने २२४ धावांच्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करत पंजाब किंग्सच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. २२० च्या आयपीएलमध्ये पंजाब किंग्सने ६ बाद २२० धावांचा यशस्वी पाठलाग केला. तर आजच्या सामन्यात राजस्थानने ८ बाद २२४ धावांचा यशस्वी पाठलाग करत या विक्रमाशी बरोबरी साधली.**



अशक्य वाटणारा विजय अखेरपर्यंत नाबाद राहत बटलरने राजस्थानला मिळवून दिला आहे. बटलरने ६० चेंडूत ६ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने १०७ धावा करत संघाला विजय मिळवून देत नाबाद परतला. जोस बटलरचे हे आयपीएलमधील सातवे शतक आहे. आयपीएलमधील सर्वाधिक शतकांच्या यादीत बटलर दुसऱ्या स्थानी आहे, तर विराट ८ शतकांसह पहिल्या क्रमांकावर आहे.रोव्हमन पॉवेल अखेरच्या षटकांत येऊन ३ षटकार लगावले ज्यामुळे बटरलला ही मोठी धावसंख्या गाठण्यास मदत झाली. रोव्हमन पॉवेलने बाद होण्यापूर्वी १३ चेंडूत ३ षटकार आणि १ चौकारासह २६ धावांची शानदार खेळी केली.राजस्थान संघाची फलंदाजीची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. चांगल्या लयीत दिसत असलेला जैस्वाल १९ धावा करत बाद झाला. तर संजू सॅमसनही आज मोठी खेळी करू शकला नाही आणि १२ धावा करत बाद झाला. रियान परागने बटलरसोबत चांगली भागीदारी रचण्याचा प्रयत्न केला. तो ३४ धावा करत हर्षित राणाच्या गोलंदाजीवर बाद झाला. तर ध्रुव जुरेल (२), अश्विन (८) झटपट बाद झाले. तर शिमरॉन हेटमारला चक्रवर्तीने गोल्डन डकवर बाद करत राजस्थानला मोठा धक्का दिला. त्यानंतर आलेल्या रोव्हमन पॉवेलने एक शानदार खेळी केली आणि बटलरवरील धावांचे ओझे कमी केले. तर ट्रेंट बोल्ट बटलरला स्ट्राईक देताना धावबाद झाला. पण त्यानंतर बटलरने तुफान फटकेबाजी करत आपले शतकही झळकावले आणि संघाला मोठा विजय मिळवून दिला. केकेआरकडून हर्षित राणा, सुनील नरेन आणि वरूण चक्रवर्ती प्रत्येकी २ विकेट घेतल्या. तर वैभव अरोराच्या खात्यात एक विकेट आहे. मिचेल स्टार्क या सामन्यातही चांगलाच महागडा ठरला. स्टार्कने ४ षटकांत सर्वाधिक ५० धावा दिल्या.तत्पूर्वी राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकत गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

### बोल्टने स्टंप तोडला

» प्रथम फलंदाजी करताना केकेआरने ६ बाद २२३ धावा केल्या. केकेआरकडून सलामीवीर सुनी नरेनने पहिले आयपीएल शतक झळकावत ५६ चेंडूत १३ चौकार आणि ६ षटकारांसह १०९ धावा केल्या आहेत. अंगक्रिश रघुवंशीने (३०) नरेनसोबत चांगली भागीदारी संघासाठी मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. बोल्टने नरेनला क्लीन बोल्ड करत बाद तर केले पण यॉर्कर टाकत त्याने स्टंपही तोडला.